महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/Sem-II-२०२५-२६/पाच/ 615 दिनांक:- 27 APR 2026

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/द्वितीय सत्र २०२६/पाच/E-३१२७२६६, दिनांक २७.०३.२०२६

२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/द्वितीय सत्र २०२६/पाच/E-३१४५४९०, दिनांक ०२.०४.२०२६

३) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं-२०२५/पाच/गुण भरणेबाबत/१३०६, दिनांक ०५.१२.२०२५

# परिपत्रक

**विषय : शासकीय उच्चकला परीक्षा (Semester II & I) (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)**

द्वितीय व प्रथम सत्र परीक्षेचे आयोजन व मुल्यांकनासंदर्भात आवश्यक सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राज्यातील संलग्नित कला परिसंस्थांमधील पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित व परीक्षेस पात्र असलेल्या नियमित विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला द्वितीय सत्र **(Semester II)** परीक्षेचे तसेच यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परीक्षेमध्ये केवळ ATKT/FAIL असा निकाल असलेल्या विद्यार्थ्यांकरिता प्रथम सत्र **(Semester I)** परीक्षेचे वेळापत्रक संदर्भिय क्र. १ व २ वरील परिपत्रकांन्वये जाहीर करण्यात आले आहे.

०२. वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या द्वितीय व प्रथम सत्र परीक्षेकरिता (SEE) लागणाऱ्या प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांच्या प्रश्नपत्रिका प्रचलित पध्दतीनुसार संबंधित विषयाच्या परीक्षेच्या एक दिवस अगोदर दुपार ०१.०० वाजता कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर पाठविण्यात येणार आहेत. लॉगिनवर प्राप्त होणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या विद्यार्थी संख्येनुसार प्रिंटआऊट गोपनियरित्या काढाव्यात व सदर प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र लिफाफ्यात मोहोरबंद करुन कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात. परीक्षेची गोपनीयता विचारात घेऊन मोहोरबंद केलेल्या प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वी परीक्षा कक्षात विद्यार्थ्यांच्या समक्ष ०२ परिक्षार्थींच्या स्वाक्षरीने उघडण्यात येऊन पाकीटावर मोहोरबंद पाकीट उघडण्याची वेळ नमूद करुन विद्यार्थ्यांना वाटप करण्यात याव्यात. प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखण्याची संपूर्ण जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०३. द्वितीय व प्रथम सत्र परीक्षेच्या आयोजनाकरिता आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या याद्या, विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र, सैध्दांतिक विषयांकरिता लागणाऱ्या उत्तरपत्रिका इ. यापूर्वीच सर्व कला परिसंस्थांना पाठविण्यात आल्या आहेत. त्यानुसार पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या सत्र पध्दतीनुसार (SEE) आयोजित करण्यात येणाऱ्या उच्चकला परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावर कला परिसंस्था स्तरावर नियुक्त करण्यात येणारे कंडक्टर, सुपरवाझर, लिपिक, शिपाई इ. आवश्यक कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशाची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती लॉगिन वरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करावी तसेच ऑफलाईन उपस्थितीपत्रक (विद्यार्थ्यांची स्वाक्षरी असलेले) उत्तरपत्रिकांसोबत मुल्यमापन केंद्रावर जमा करण्यात यावे. ऑफलाईन उपस्थितीपत्रक, कंडक्टर व सुपरवाय रिपोर्टचे नमुने उच्चकला परीक्षेच्या https://hae.semesterpattern.msbae.in/ या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

०४. वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या द्वितीय सत्र **(Semester II) (SEE)** परीक्षेच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता मुल्यमापन केंद्रावर पाठविण्यात याव्यात. **तथापि, खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या विषयांचे मुल्यांकन कला परिसंस्था स्तरावर करण्यात यावे.**

| अ.क्र. | अभ्यासक्रम (Programme) | विषय संकेतांक (Course Code) | विषय (Course) |
|---|---|---|---|
| 1 | Foundation Certificate in Art and Design | 250122 | Advanced Design (3D) |
| | | 250125 | Tattoo Design |
| 2 | Art Teacher Diploma | 250525 | Micro Teaching Method |
| 3 | Diploma in Art Education | 250625 | Teaching Practice |
| | | 250621 | 3D Art and Sculpture |
| 4 | Art Master Certificate | 250725 | Teaching Practice (Internship) |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या अभ्यासक्रमातील विषय वगळता इतर सर्व प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता मुल्यमापन केंद्रावर विहित वेळेत जमा करण्यात याव्यात. मुल्यमापन केंद्रांबाबत लवकरच कळविण्यात येईल.

०५. द्वितीय सत्र (Semester II) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे सैध्दांतिक (Theory) व प्रात्यक्षिक (Practical) विषयांच्या Contineous Assessment (CA) मुल्यांकनाचे गुण सर्व परीक्षा केंद्रांनी लॉगिन आयडीद्वारे **दिनांक ०४.०५.२०२६ ते ०८.०५.२०२६** या कालावधीत ऑनलाईन भरावे. कला परिसंस्था स्तरावरील Continuous Assessment (CA) मुल्यांकनाचे गुण ऑनलाईन भरण्याची सुविधा उच्चकला परीक्षेच्या https://hae.semesterpattern.msbae.in/ या लिंकवर Enter Marks of Theory CA & Practical CA या टॅबअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. Continuous Assessment (CA) मुल्यांकनाचे गुण ऑनलाईन भरण्याच्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले उक्त संदर्भिय क्र. ३ वरील दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. सदर परिपत्रक उच्चकला परीक्षेच्या वरील लिंकवर सुलभ संदर्भाकरिता उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

०६. तसेच, द्वितीय सत्र (Semester II) (SEE) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे वरील तक्त्यात नमूद अभ्यासक्रमातील विषयांचे कला परिसंस्था स्तरावरील मुल्यांकनाचे गुण ऑनलाईन भरण्याकरिता वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

०७. संदर्भ क्र. ३ वरील दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सुचनेनुसार प्रथम सत्र (Semester I) (SEE) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या (ATKT/Fail Students) विद्यार्थ्यांचे ATKT किंवा Fail असलेल्या विषयाचे कला परिसंस्था स्तरावरील मुल्यांकनाचे गुण वरीलप्रमाणे लॉगिनद्वारे ऑनलाईन भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच, संदर्भ क्र. ३ वरील परिपत्रकासोबत जोडलेल्या थेअरी व प्रॅक्टिकल एकत्रित विषय असलेल्या विषयांच्या यादीतील विषयांव्यतिरिक्त ATKT किंवा Fail असलेल्या विद्यार्थ्यांच्या अन्य सैध्दांतिक (Theory) (SEE) विषयांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता मुल्यमापन केंद्रावर जमा करण्यात याव्यात.

०८. वरील सुचनांचे पालन कला परिसंस्था स्तरावर करण्यात यावे. ऑनलाईन गुण भरण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास Software Support Person [कु. वृषाली घोटणे, भ्रमणध्वनी क्र. ९२८४३८१०४१] ) यांचेशी संपर्क साधावा.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (सर्व)

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय,छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.